जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र. आधोव्यनिक/कोरोना विषाणू/ /2020, दिनांक :- /03/2020.

वाचले - 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
2. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43.
3. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.
4. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (उ.श्रे.) व मुद्रांक जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडील दि.20/03/2020 रोजीची टिपणी.

विषय :- करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्त नोंदणी बंद ठेवणेबाबत.

## आदेश

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामिण व शहरी भागात दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीसाठी मोठ्याप्रमाणात नागरिकांची गर्दी होते. सद्य परिस्थीतीत कोरोना या विषाणूचा संसर्ग प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य् व्यक्तीस त्याच्या संपर्कात आलेने होते त्या अनुषंगाने जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील दुय्यम निबंधक कार्यालयामधील दस्त् नोंदणी साठी होणारी नागरिकांची गर्दी पहाता सदर ठिकाणी दस्त नोंदणी बंद ठेवणे आवश्य्क आहे व तशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा भाग म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्त नोंदणीचे कामकाज दि. 23/03/2020 ते पुढील आदेश होईपर्यत बंद ठेवणेचे आदेश देणेत येत आहेत.

तसेच सदर कार्यालयातील इतर कामकाजांबाबतचे निर्णय सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी घेणेत यावेत.

(दौलत देसाई)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**कोल्हापूर**

प्रति,

1. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (उ.श्रे.) व मुद्रांक जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना माहिती व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- 1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
2. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

2 / . . .

Scanned by CamScanner

3. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
4. सर्व उपविभागीय अधिकारी
5. सर्व तहसिलदार
6. जिल्हा माहिती अधिकारी,. कोल्हापूर यांनी सदर आदेशास योग्यती प्रसिध्दी द्यावी.

Scanned by CamScanner